| | |
|---|---|
| MHST080002472024 | **नियमित दिवाणी दावा क्र.८१/२०२४**<br>श्री. योगेश रामचंद्र कोंडे<br>-वि-<br>श्री. सागर भिकू महांगरे व इतर |

## निशाणी ३८ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.८ यांनी त्यांच्याविरुद्ध पारीत करण्यात आलेला एकतर्फाचा आदेश रद्द करुन त्यांना दाव्याचे कामी हजर करुन घेऊन त्यांना कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

**०२.** प्रतिवादी क्र.८ यांच्या म्हणण्यानुसार, त्यांना दिनांक ०६.०४.२०२४ रोजी दाव्याच्या समन्सची बजावणी झाली. परंतु, ते आजारी असल्यामुळे त्यांना दाव्याचे कामी हजर राहता आले नाही. त्यामुळे, त्यांनी त्यांच्याविरुद्ध पारीत करण्यात आलेला एकतर्फाचा आदेश रद्द करुन त्यांना दाव्याचे कामी हजर करुन घेण्याची व त्यांची कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळण्याची विनंती केली.

**०३.** वादी यांनी सदर अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन अर्जातील कथने नाकारली आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार, अर्जामध्ये नमूद केलेली कारणे ही योग्य व संयुक्तिक नाहीत. त्यामुळे, त्यांनी सदरचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली. तसेच, जर अर्ज मंजूर करावयाचा झाल्यास जास्तीत जास्त कॉस्टवर अर्ज मंजूर करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली.

**०४.** अर्ज व त्यावरील म्हणणे याचे अवलोकन केले. सदर दाव्याचा

न्यायनिर्णय गुणावगुणावर होण्यासाठी प्रतिवादी क्र.८ यांचे विरुद्ध पारीत करण्यात आलेला एकतर्फाचा आदेश रद्द करुन त्यांना त्यांची कैफियत दाखल करणेस परवानगी देणे योग्य व न्यायोचीत होईल. परंतु, कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब पाहता सदरचा अर्ज खर्चासह मंजूर करणे योग्य व न्यायोचीत होईल. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. सदरचा अर्ज खर्चासह मंजूर करणेत येत आहे.

२. प्रतिवादी क्र.८ यांनी वादी यांना एकूण रक्कम रुपये २००/- ची कॉस्ट देणेच्या अटीवर सदरचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे. सदर कॉस्टची रक्कम वादी यांना दिल्यानंतर प्रतिवादी क्र.८ यांची कैफियत पटलावर घेण्यात यावी.

PATTEBAHADUR KARUNA

Digitally signed by PATTEBAHADUR KARUNA
Date: 2025.04.24 14:30:26 +0530

दिनांकः २३.०४.२०२५ (श्रीमती क. अ. पट्टेबहादूर)
खंडाळा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, खंडाळा